**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
केंद्रीय कापूस संशोधन संस्था
नागपूर

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 23-06-2026**

**नागपूर(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2026-06-23 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2026-06-24 | 2026-06-25 | 2026-06-26 | 2026-06-27 | 2026-06-28 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 15.8 | 16.3 | 16.8 | 8.3 | 9.1 |
| कमाल तापमान (अं.से) | 40.6 | 40.7 | 40.8 | 40.9 | 40.7 |
| किमान तापमान (अं.से) | 22.8 | 22.9 | 23.1 | 23.2 | 23.3 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 70 | 72 | 74 | 75 | 70 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 40 | 37 | 37 | 39 | 29 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 11 | 10 | 10 | 6 | 9 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 246 | 255 | 283 | 301 | 258 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 4 | 4 | 4 | 5 | 5 |
| चेतावणी | गडगडाटी वादळे आणि विजा, स्कॉल; मजबूत पृष्ठभाग वारे | गडगडाटी वादळे आणि विजा, स्कॉल; मजबूत पृष्ठभाग वारे | गडगडाटी वादळे आणि विजा, स्कॉल; मजबूत पृष्ठभाग वारे | गडगडाटी वादळे आणि विजा, स्कॉल; मजबूत पृष्ठभाग वारे | गडगडाटी वादळे आणि विजा, स्कॉल; मजबूत पृष्ठभाग वारे |

## भविष्यवाणी सारांश:

• नागपुर जिल्ह्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या जिल्हास्तरीय अंदाजानुसार, पुढील ५ दिवसा दरम्यान आकाश आंशिक ते अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक २४, २५ आणि २६ जून २०२६ रोजी काही ठिकाणी (विखुरलेल्या स्वरूपाचा) हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता, • दिनांक २७ आणि २८ जून २०२६ रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## हवामान चेतावणी (पुढील दिवशी 08:30 IST पर्यंत वैध):

| |
|---|
| • दिनांक २४, २५, २६ आणि २७ जून २०२६ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह (४० ते ५० किमी/तास) मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. |

## हवामान चेतावण्यांचे कृषीवरील संभाव्य प्रभाव आणि संबंधित एग्रोमेट सल्ले:

| |
|---|
| • मेघगर्जनेसह विजांचा कडकडामुळे पशुधन, शेतकरी किंवा शेतमजुरास इजा अथवा मृत्मृ होऊ शकतो. वादळी वाऱ्यामुळे झाडांवरील फळांची गळ होऊ शकते, गोठा अथवा शेतात साठवलेला चाऱ्याचे नुकसान होऊ शकते. पावसामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती अथवा खुल्या बाजारामध्ये शेतकऱ्यांद्वारा विक्रीसाठी आणलेला शेतमाल पावसाच्या संपर्कात खराब होऊ शकतो. |

## कृषि सल्ला:

| |
|---|
| • जिल्ह्यात सद्यस्थितीत पेरणीयोग्य पुरेसा पाऊस झाला नसल्याने अपुऱ्या ओलाव्यामध्ये खरीप पिकांची पेरणी टाळावी. • मेघगर्जनेसह वादळ वारा व पावसापासून पशुधन व कुक्कुट पक्षांचे साठवलेले पशुखाद्य, चारा व कडबा ई. प्लास्टिक/ताडपत्रीने झाकून ठेवावे. • पावसाचे पाणी जागेवर मुरण्यासाठी मुख्यतः शेताची पेरणी पूर्व मशागत समतल (कंटूर) शेतीला समांतर किंवा मुख्य उताराला आडवी करावी. ही बाब अवर्षणाचे समजून शेतात अवलंब करावी. • पेरणीसाठी सर्व बियाण्यांची (विशेषतः सोयाबीनची) उगवणक्षमता घरात तपासावी. बियाण्याची उगवण क्षमता ७० ते ८० टक्के असल्यास पेरणीसाठी बियाणे वापरावे. यामुळे बियाणे झाडांची योग्य संख्या राहून चांगले उत्पादन मिळते. • माती परीक्षा अहवालाच्या शिफारशीप्रमाणे रासायनिक खतांचा मात्रा घ्यावा व त्यानुसार रासायनिक खतांचा मात्रा वापर करावा. खतांचा डोस दिल्यास पिकांच्या उत्पादनात घट येते. • कोरडवाहू सलग पिका एवजी खालिल आंतर पिके घ्यावीत. कपाशी : ज्वारी : तूर : ज्वारी (६:१:२:१ ओळी), • सोयाबीन : ज्वारी : तूर : ज्वारी (६:१:२:१ ओळी), सोयाबीन : तूर (२:१ किंवा ४:१ किंवा ५:१ ओळी), कपाशी : मूग किंवा उडीद (९:१ ओळी). • मूग पिकाच्या पेरणीसाठी, कोपरगाव, पी.के.व्ही. ए.के.एम.-४, पी.के.व्ही. मूग-८८०२ आणि पी.के.व्ही. ग्रीन गोल्ड (ए.के.एम.-९९११) या वाणांपैकी एकाची निवड करावी. उडीद पिकाच्या पेरणीसाठी, पी.के.व्ही. उडीद (ए.के.यू.-१५), पी.डी.के.व्ही. ब्लॅक गोल्ड (ए.के.यू.-१०-१), टी.ए.यू.-१ आणि टी.ए.यू.-२ या वाणांपैकी निवड करावी. तूर पिकासाठी शिफारस केलेले वाण: ए.के.टी.-८८११, पी.के.व्ही.-तारा, बी.एस.एम.आर.-८५३, बी.एस.एम.आर.-७३६, बी.डी.एन.-७१६ आणि आय.सी.पी.एल.-८७११९ (आशा) या वाणांची निवड करावी. |

## संक्षिप्त संदेश सल्ला:

| |
|---|
| • जिल्ह्यात सद्यस्थितीत पेरणीयोग्य पुरेसा पाऊस झाला नसल्याने अपुऱ्या ओलाव्यामध्ये खरीप पिकांची पेरणी टाळावी. |

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| सोयाबीन | • मान्सून चा पुरेसा पाऊस होईपर्यंत सोयाबीन ची पेरणी टाळावी. • सोयाबीन लागवडीकरता मध्यम ते भारी प्रतीची, उत्तम पाण्याचा निचरा होणारी, तसचे सामू ६.५ ते ७.५ असणारी जमीन निवडावी. नांगरणी नंतर वखराच्या २ ते ३ पाळ्या देऊन जमीन समपातळीत करावी त्याचबरोबर शेवटच्या वखराच्या पाळीपूवी ५ टन चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट खत पेरणी पूर्वी शेतात एक सारखे सम प्रमाणात मिसळून द्यावे. खते, तणनाशके, बुरशीनाशके आणि बीज प्रक्रियेसाठी लागणारी जीवाणू संवर्धने इत्यादी महत्वाच्या निविष्ठांची उपलब्धता सुनिश्चित करावी. घरचे धान्य बियाणे म्हणून वापरावयाचे असल्यास बियाण्याची उगवण क्षमता तपासून घ्यावी. • सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना असा सल्ला देण्यात येत आहे की, मान्सून चा १०० मिमी पाऊस पडल्यानंतरच सोयाबीन पिकाची पेरणी करावी. शेतकऱ्यांनी लवकर किंवा मध्यम पक्व होणाऱ्या सोयाबीनच्या किमान दोन जातींना प्राधान्य द्यावे आणि बीबीएफ (रुंद वरंबा सरी) लागवड पद्धतींचा वापर करावा. |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| तूर | `• मान्सून चा पुरेसा पाऊस होईपर्यंत तूर पेरणी टाळावी. • तुरीच्या पेरणीपूर्वी नागरणी व वखराच्या २ ते ३ पाळ्या देऊन शेतजमीन तयार करावी. शेवटच्यावखरणी पूर्वी १५ ते २० गाड्या / हेक्टरी चांगले शेणखत शेजमिनीत मिसळावे. • तूर पिक लागवडीकरिता शेतजमीन तयार करावी. • तूर पिकाचे चांगल्या प्रतीचे बियाणे अधिकृत विक्रेत्याकडून/प्रमाणित बियाणेधारकाकडूनच करावी. तूर बियाण्याला बीज प्रक्रियेसाठी रायझोबियम किंवा स्फुरद विरघळविणारे खते (पीएसबी) {२५० ग्राम प्रती १० किलो बियाणे} यांचा वापर करावा. • तूर पिकाचे शिफारस केलेले वाणएकेटी-८८११, पीकेव्ही-तारा, बीएसएमआर-८५३, बीएसएमआर-७३६,बीडीएन-७१६ आणि आयसीपीएल-८७११९ (आशा). |
| कपाशी | • मान्सून चा पुरेसा पाऊस होईपर्यंत कपाशीची लागवड टाळावी. • शेतकऱ्यांना सल्ला दिला जातो की, ७५-१०० मिमी पुरेसा पाऊस पडल्यानंतरच कपाशीची पेरणी सुरू करावी. कोरडवाहू लागवडी साठी कमी कालावधीच्या बीटी/नॉन-बीटी वाणांचा/संकरित वाणांचा आणि बागायतीसाठी मध्यम-उशिरा ते उशिरा येणाऱ्या वाणांचा/संकरित वाणांचा वापर करावा. जर बाजारात उपलब्ध असलेल्या कापसाच्या बियाण्यांवर कीटकनाशकांची पूर्व-प्रक्रिया केलेली नसेल, तर पेरणीपूर्वी बियाण्यांवर कार्बोक्सिन (विटावॅक्स) १ ग्रॅम किंवा थिरम ३ ग्रॅम/किलो बियाणे या प्रमाणात प्रक्रिया करावी. तसेच, नायट्रोजन स्थिरीकरणासाठी अझोटोबॅक्टर आणि फॉस्फेट विद्राव्यीकरणासाठी पीएसबी (PSB) २०-२५ ग्रॅम/किलो बियाणे या प्रमाणात बियाण्यांवर प्रक्रिया करावी. • कपाशीमध्ये १:१ ओळींच्या प्रमाणात मूग आणि उडीद यांसारखी आंतरपिके समाविष्ट करावीत. पिकाच्या सुरुवातीच्या टप्प्यात तण नियंत्रणासाठी उगवणपूर्व तणनाशक म्हणून पेंडिमेथालिन ३८.७ % सीएस (CS) ७०० मिली/एकर या प्रमाणात वापरावे. देशी वाणासाठी (60x15, 60x30 सेमी, 40:20:20 किलो एनपीके/हेक्टर), सुधारित हिर्सुटम वाणांसाठी (60x30 सेमी, 60:30:30 किलो एनपीके/हेक्टर) आणि कोरडवाहू बीटी संकरित कापूस (90x45, 90x60, 60:30:30 किलो एनपीके/हेक्टर) आणि ओलिताखालील बीटी कापूस (120x30, 120x60 सेमी, 120:60:60 किलो एनपीके/हेक्टर) यांच्यासाठी अनुक्रमे शिफारस केलेले अंतर आणि खतांच्या मात्रा द्यावी. |
| मुग | • मान्सून चा पुरेसा पाऊस होईपर्यंत मुग ची पेरणी टाळावी. • मुगाच्या पेरणीसाठी शेतजमीन वखराच्या २ ते ३ पाळ्या देऊन तयार करावी.शेवटच्या वखरणीपूर्वी चांगले कुजलेले शेणखत ५ टन/हेक्टरी जमिनीत टाकावे. • मुग पिकाच्या पेरणीसाठी कोपरगाव, पी.के.व्ही. ए.के.एम.-४, पी.के.व्ही.मुग -८८०२ आणि पी.के.व्ही.ग्रीन गोल्ड (ए.के.एम-९९११) यापैकी एका वाणांची निवड करावी. • लिफ क्रिंकल रोग हा रोगग्रस्त बियाणांद्वारे होत असल्यामुळे बियाण्यास गरम पाण्याची बीज प्रक्रिया ५२° से. तापमानावर २० ते ३० मिनिटे ठेवून करावी. या पिकात सुरुवातीस प्रादुर्भाव रस शोषणाऱ्या किडीमुळे होत असल्यामुळे या किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी इमिडाक्लोप्रिड ७० टक्के डब्ल्यू जी या कीटकनाशकाची ५ ग्रॅम प्रति किलो किंवा इमिडाक्लोप्रिड ४८ टक्के एफएस १० मि.लि. प्रति किलो या प्रमाणे बीज प्रक्रिया करावी. |
| उडद | • मान्सून चा पुरेसा पाऊस होईपर्यंत उडीद पेरणी टाळावी. • उडीदाच्या पेरणीसाठी शेतजमीन वखराच्या २ ते ३ पाळ्या देऊन तयार करावी.शेवटच्या वखरणीपूर्वी चांगले कुजलेले शेणखत ५ टन/हेक्टरी जमिनीत टाकावे. • उडीदाच्या पेरणीसाठी पी.के.व्ही. उडीद (ए.के.यू.-१५), पी.डी.के.व्ही.ब्लॅक गोल्ड (ए.के.यू.-१०-१), टी.ए.यु-१ आणि टी.ए.यु.-२ यापैकी एका वाणांची निवड करावी. |
| मका | • मान्सून चा पुरेसा पाऊस होईपर्यंत मका ची पेरणी टाळावी. • मक्याच्या पेरणीसाठी राजर्षी, पीकेव्ही एम शतक, उदय, कुबेर यापैकी एका वाणांची निवड करावी.मक्याच्या खरीपातील पेरणीसाठी शक्यतो सरळ वाणांची निवड करावी,कारण संकरीत वाणांच्या तुलनेत सरळ वाणांचा लागवडीचा खर्च कमी व निव्वळ नफा जास्त येतो. • मका पिकावरील नवीन लष्करी अळीसाठी स्वच्छता मोहीम राबवावी व शिफारशीत खताची मात्रा द्यावी तसेच नत्र खतांचा अतिरिक्त वापर करू नये. मका बियाण्यास सायन्ट्रॅनिलीप्रोल १९.८ + थायोमेथॉक्साम १९.८ टक्के एफएस ६ मि.लि. प्रति किलो या प्रमाणे बीज प्रक्रिया करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| बकरा किंवा बकरी | • विजांचा कडकडाटासह मेघगर्जना होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. • शेतकऱ्यांनी पावसाळ्यापूर्वी गोठा दुरुस्त करावा छताची छिद्रे बंद करावीत. गोठयात भोवती पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| बकरा किंवा | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| बकरी | |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना स्थानिक हवामान व परिस्थितीचे अनुकूल शिफारस केलेले वाण निवडावेत. कारण अशा वाणांमध्ये कीडी व रोगांविरुद्ध प्रतिकारक्षमता किंवा सहनशीलता अधिक असते. नजीकच्या संगणक डाटा केंद्रांमध्ये उपलब्धलेल्या बियाण्यांच्या अनुभवाची माहिती बियाणे खरेदीसाठी उपयुक्त ठरू शकते. आपल्या परिसरातील कृषी विभागातील कृषी अधिकारी व शास्त्रज्ञ यांच्याशी चर्चा करून नवीन, सुधारित व संकरित वाणांची माहिती घ्यावी तसेच संबंधित पीक पद्धतीबाबत तांत्रिक मार्गदर्शन मिळवावे. ओलीत किंवा सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास, त्यानुसार योग्य वाणाची निवड करावी. कोरडवाहू जमिनीसाठी शिफारस केलेल्या वाणांचीच निवड करावी.उत्तम प्रतीचे, खात्रीशीर बियाणे केवळ नोंदणीकृत कृषी सेवा केंद्रातून खरेदी करावे.कृषी विद्यापीठे किंवा विद्यापीठांचे संशोधन केंद्रांकडे बियाणे उपलब्ध असता तर तिथून ते खरेदी करावे. बियाण्याची खरेदी करताना केवळ कंपनीचे प्रतिनिधी किंवा विक्रेते यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवू नये. तसेच कंपनीच्या जाहिरातींवर अवलंबून न राहता, संबंधित वाणांची अधिकृत माहिती तपासावी. शिफारस, स्थानिक परिस्थितीत त्याची कामगिरी, कृषी विभाग/विद्यापीठांचे मार्गदर्शन आणि इतर शेतकऱ्यांचा अनुभव यांचा विचार करूनच बियाण्याची निवड व खरेदी करावी. |

## हवामान चेतावण्यांचे संभाव्य प्रभाव (सामान्य):

• मेघगर्जनेसह विजांचा कडकडामुळे पशुधन, शेतकरी किंवा शेतमजुरास इजा अथवा मृत्मृ होऊ शकतो. वादळी वाऱ्यामुळे झाडांवरील फळांची गळ होऊ शकते, गोठा अथवा शेतात साठवलेला चाऱ्याचे नुकसान होऊ शकते. पावसामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती अथवा खुल्या बाजारामध्ये शेतकऱ्यांद्वारा विक्रीसाठी आणलेला शेतमाल पावसाच्या संपर्कात खराब होऊ शकतो.

## परिणाम आधारित सल्ला (सामान्य):

मेघगर्जना, विजांचा कडकडाट व वादळी वायाचा अंदाज लक्षात घेता पशुधनास उघड्यावर चराई क्षेत्रावर चरावयास सोडणे टाळावे. जनावराना गोठया मध्येच चारा व पाण्याची व्यवस्था करावी. शेतात काम करताना मेघगर्जनेची चाहूल लागताच तात्काळ सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. जिह्यातील मागील घटनांचा संदर्भ लक्षात घेता मेघगर्जनेच्या वेळी पळस, कडूनिंब तसेच ईतर कोणत्याही झाडाखाली आश्रय टाळावा. वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता बाजारा योग्य फळे तसेच भाजीपाला पिकाची काढणी करून विक्री करावी. फळझाडांना बाबूच्या सहाय्याने आधार द्यावा.

**Farmers are advised to download Unified �Mausam� and "Meghdoot" android application on mobile for Weather forecast and weather based Agromet Advisories and "Damini" android application for forecast of Thunderstorm and lightening.**

**Mausam MobileApp link: https://play.google.com/store/apps/details/**

**Meghdoot MobileApp link: https://play.google.com/store/apps/details**

**Damini MobileApp link : https://play.google.com/store/apps/details**